| MHKO110009522019 | नियमित दिवाणी दावा क्र. ९५/२०१९ मधील नि. क्र. ४२ खालील आदेश<br>कस्तुरी गुरव<br>वि.<br>विनायक गुरव व इतर |
|---|---|

प्रस्तुतचा अर्ज वादी यांनी प्रतिवादी क्र. २ यांचे वारसांना रेकॉर्डवर आणणेकरीता दाखल केलेला आहे.

**०२.** वादी यांनी असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्र. २ नेताजी मधुकर गुरव हे दि. ०५/०७/२०२४ रोजी मयत झालेले असून त्यांना खालील वारस आहेत-

| अ. क्र. | वारसाचे नाव व पत्ता | प्रतिवादीशी नाते |
|---|---|---|
| १. | लता उर्फ लतिका नेताजी गुरव,<br>वय – ४५ वर्षे, धंदा- घरकाम,<br>रा. तिसंगी, कवठेमहाकाळ, जि. सांगली. | पत्नी |
| २. | मयुर नेताजी गुरव,<br>वय – २७ वर्षे, धंदा- व्यवसाय<br>रा. तिसंगी, कवठेमहाकाळ, जि. सांगली. | मुलगा |
| ३. | श्वेता दशरथ गुरव,<br>वय – २४ वर्षे, धंदा- घरकाम,<br>रा. तिसंगी, कवठेमहाकाळ, जि. सांगली. | मुलगी |

**०३.** सदरचे वारस सोडून प्रतिवादी क्र. २ यांना अन्य कोणीही वारस नाहीत. तरी दाव्याचा गुणदोषावर न्यायनिवाडा होणेकरीता प्रतिवादी क्र. २ यांचे वर नमूद वारसांना सदर कामी रेकॉर्डवर घेणेची विनंती वादी यांनी केलेली आहे.

**०४.** प्रतिवादी यांनी सदर अर्जाचे कामी त्यांचे म्हणणे दिलेले आहे. त्यांनी प्रस्तुत अर्जास तीव्र आक्षेप नोंदवून असे कथन केले आहे की, यातील मयत प्रतिवादी क्र.२ नेताजी मधुकर गुरव यांचे वारस क्र. १ ते ३ यांना रेकॉर्डवर घेणेसाठी वादी यांनी जाणूनबुजून १५ दिवसांचा विलंब केलेला आहे. तरीही न्यायाच्या दृष्टीने योग्य तो हुकुम करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

**०५.** प्रस्तुतचा अर्ज व अभिलेखाचे अवलोकन केले असता, असे दिसून येते की, सदरचा दावा हा वाटपाकरिता व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. प्रतिवादी क्र. २ हे दि. ०५.०७.२०२४ रोजी मयत झाले असून मर्यादा कायदा, १९६३ चे आर्टीकल १२० नुसार वादींनी प्रस्तुतचा अर्ज ९० दिवसांच्या आत म्हणजे दि. ०४.१०.२०२४ पर्यंत दाखल करणे गरजेचे होते. तथापि, सदरचा अर्ज दाखल करणेस वादी यांनी १५ दिवसांचा विलंब केलेला आहे.

**०६.** प्रस्तुत दाव्याचे कामी मल्टीप्लीसीटी ऑफ प्रोसिंडींग टाळण्याकरीता व काम गुणदोषांवर चालून निकाली होणेकरीता मयत प्रतिवादी क्र.२ चे वारस रेकॉर्डवर घेणे गरजेचे आहे. तसेच यातील वादी हया वयस्कर महिला आहेत, त्यांची आर्थिक परिस्थिती गरीबीची आहे, सदरचा अर्ज मंजूर केलेस प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. प्रस्तुत कामी वारस रेकॉर्डवर घेणेस झालेला विलंब नि. ४१ खाली खर्चासह माफ करणेत आलेला आहे. त्यामुळे प्रतिवादींवर दंड आकारणे गरजेचे नाही. सबब, न्यायाच्या कारणास्तव मी पुढील आदेश पारीत करत आहे-

**<u>आदेश</u>**

| | |
|---|---|
| १. | प्रस्तुतचा नि. ४२ खालील अर्ज मंजूर करणेत येतो. |
| २. | सदर कामी प्रतिवादी क्र. २ यांच्या नावापुढे (मयत वारस) असे अभिलेखावर घेऊन तशी दुरूस्ती या कामी अंतिम आदेशापासून १४ दिवसांच्या आत करावी व दुरूस्तीप्रत सदर कामी हजर करावी. |

**स्वाक्षरी/-**

**दिनांकः- ०३.०७.२०२५** **( आर. एस. मोरे )**
**पेठवडगाव** **३ रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,**
**पेठवडगाव.**